# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या एक्कावणाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.०९ मे, २०१३ दुपारी १२:१५ वा.

**व्यवस्थापन परिषदेची एक्कावणावी सभा गुरुवार, दि.०९ मे, २०१३ रोजी दुपारी १२:१५ वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. तथा प्रभारी कुलसचिव | सदस्य तथा सचिव |
| ५) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ६) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ९) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १३) | सौ. पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या |
| १४) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १५) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |

**अनुपस्थिती :**

प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी दूरध्वनीद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.२२ एप्रिल, २०१३ रोजीच्या पन्नासाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.२२ एप्रिल, २०१३ रोजीच्या पन्नासाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**१) पान क्र. २/३ वर, ठराव क्र. ०२ मध्ये, "व अपीलाच्या निर्णयानुसार विद्यापीठाने कार्यवाही करावी असे ठरले." हे शब्द वगळण्यात यावेत.**

**दुरुस्त ठराव खालीलप्रमाणे आहे.**

**"संबंधित सर्व कर्मचाऱ्यांकडून खुलासा आल्यानंतर व्यवस्थापन परिषदेसमोर चर्चा करुन मा. शिक्षण संचालक (उ. शि.) पुणे यांच्याकडे अपील करण्यात यावे."**

**[ ०२ ] सन २००४-०५ ते सन २०११-१२ या कालावधीतील अनुदान निर्धारण अहवालावेळी अनुभव नसताना नेमणूका झालेल्या अधिकारी यांचे वेतन अमान्य केल्याचा अनुदान निर्धारण अहवाल विद्यापीठास प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने दि.२२/०४/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्रं.०२ नुसार सर्व अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेला खुलासा विचारार्थ.**

(टिपणी : मा.शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण,सोलापूर विभाग, सोलापूर यांचे कार्यालयाकडून विद्यापीठाचे सन २००४-०५ ते सन २०११-१२ या कालावधीतील प्रलंबित असलेले वेतन अनुदान निर्धारण करण्यात आलेले आहे.अनुदान निर्धारणानंतर शासन पत्र क्रं.शिससं/उशि/सोवि/२०१३/४५१-५३ दि.१६/३/२०१३ व पत्र क्रं.शिससं/उशि/सोवि/२०१३/६५५-५७ दि.०६/०४/२०१३ अन्वये अहवाल प्राप्त झालेला आहे. अहवालामध्ये अनुभव नसताना नेमणूका केल्याने सोबतच्या यादीनुसार अधिकारी यांचे वेतन अमान्य करण्यात आलेले आहे.त्यानुसार विद्यापीठ पत्र क्रं.सोविसो/आस्था/४१५ दि.१८/०४/२०१३ च्या पत्रान्वये, उक्त बाबीबाबत संबंधितांना काही म्हणणे व खुलासा सादर करावयाचा असल्यास दि.२५/०४/२०१३ पर्यत सादर करावा. सदर कागदपत्र व खुलाशाच्या आधारे मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडे अपील सादर करण्यात येईल. सदरचे अपील मान्य झालेनंतरच आपले येथून पुढे वेतन अदा करण्यात येईल, संबंधितास असे कळविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने दि.२२/०४/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत विषय क्रं.२ नुसार सदरचा अहवाल अवलोकनार्थ ठेवला असता, खालील ठराव पारित करण्यात आलेला आहे.

| |
|---|
| संबंधित सर्व कर्मचा-यांकडून खुलासा आल्यानंतर व्यवस्थापन परिषदेसमोर चर्चा करुन मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांच्याकडे अपील करण्यात यावे व अपीलाच्या निर्णयानुसार विद्यापीठाने कार्यवाही करावी असे ठरले. |

मा. व्यवस्थापन परिषदेने सुचविलेप्रमाणे सर्व संबंधित १५ कर्मचाऱ्यांचे वेतन (एप्रिल पेड इन मे) अदा केलेले आहे.

तसेच, मा.सहसंचालक, (उ.शि.) सोलापूर विभाग या कार्यालयाकडील पत्र क्रं.शिससं/उशि/सोवि/७४४-७४५ दि.२०/०४/२०१३ च्या पत्रान्वये, सोबतच्या यादीतील श्री.मेटकरी, श्रीमती पांढरे व श्री हराळे यांचे वेतन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच शासनाने मार्च २०१२ ते जुलै २०१२ या कालावधीत नियुक्त केलेल्या अधिका-यांच्या बाबतीत शासन नियुक्त समितीमार्फत चौकशी होईपर्यत वेतन थांबविता येणार नसल्याने, सध्यस्थितीत या तिघांचे वेतन

थांबविण्यात येऊ नये असे कळविण्यात आलेले आहे.त्यानुसार त्यांना विद्यापीठ पत्र क्रं.सोविसो/आस्था/६१० दि.२५/४/२०१३ अन्वये पूर्वी दिलेले दि.१८/०४/२०१३ चे पत्र रद्द करण्यात आलेले असल्याचे कळविण्यात आले आहे.

सबब, वेतन अमान्य झालेल्या यादीतील १८ पैकी १२ अधिका-यांचे खुलासे व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **वेतन अमान्य झालेल्या यादीतील १८ पैकी १२ अधिकाऱ्यांचे खुलाशे विद्यापीठाकडे सादर झाले आहेत. त्याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांना व्यवस्थापन परिषदेसमोर बोलाविण्यात आले. खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या खुलाश्याप्रमाणे मा. शिक्षण संचालक (उ. शि.) पुणे यांच्याकडे अपील करण्याचे व त्यांची बाजू विद्यापीठ प्रशासनाने मांडण्याचे ठरले.**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | श्रीमती चोपडे अर्चना बाबासाहेब | सहाय्यक कुलसचिव |
| २) | श्री. कांबळे सुर्यकांत नंदकुमार | सहाय्यक कुलसचिव |
| ३) | श्री. पवार आनंद बहिरु | कक्ष अधिकारी |
| ४) | श्री. सोनकांबळे सोमनाथ पांडुरंग | कक्ष अधिकारी |
| ५) | श्री. हैनाळकर मलकारसिध्द महादेव | कक्ष अधिकारी |
| ६) | श्री. कुलकर्णी गिरीष अनंत | विद्यापीठ अभियंता |
| ७) | श्री. चोरमले प्रशांत रावसाहेब | सिस्टीम ॲनालिस्ट |
| ८) | श्री. कोळी संतोष तुकाराम | कनिष्ठ अभियंता |
| ९) | श्री. खपाले राजीव उत्तम | लेखापाल |
| १०) | श्री. शिंदे शिवाजी नारायण | सहाय्यक कुलसचिव |
| ११) | श्री. बनसोडे सुशील श्रीनिवास | प्रोग्रामर |
| १२) | श्री. चव्हाण आनंद मारुती | सिस्टीम ॲनालिस्ट |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**